# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 110/2022 दिनांक : 14.03.2022

## 1)नौकराने केलेली चोरी :–

**अर्धापुर :–** दिनांक 06.02.2022 रोजी चे 16.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरी मौ. जांभरुन ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांनी त्यांचे शेत कामासाठी व घरकामासाठी ठेवलेला यातील नमुद आरोपीने फिर्यादीचे घरी कोणी नसल्याचे पाहुन घरामधील कपाटामध्ये ठेवलेले सोन्या चांदीचे दागीने किंमती 2,44,114/– रुपयाचे चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी कोंडीबा माधवराव जिंके, वय 61 वर्षे, व्यवसाय शेती रा. जांभरुन ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 58/2022 कलम 381 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री आगलावे**, **मो.क्र. 9767777884** हे करीत आहेत.

## 2)गंभीर दुखापत :–

**1)भाग्यनगर :–**दिनांक 12.03.2022 रोजी चे 18.00 वा. चे सुमारास, **वेलकम जेन्टस पार्लरच्या समोर वामनराव मंगल कार्यालयाच्या बाजुला पुर्णा रोड नांदेड येथे,** यातील फिर्यादी व फिर्यादीचा मावश भाऊ दुकानावर कटिंग चे काम करीत असताना यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन दुकानातुन कांऊटरवरील वस्तरा घेवून जात असताना फिर्यादीचा मावस भाऊ वस्तरा घेण्यासाठी गेला असता नमुद आरोपीतांनी त्यास पाठीवर,पोटावर, छातीच्या दोन्ही बरगडयावर,दंडावर घातक लोखंडी सळईने मारुन गंभीर दुखापत करुन लाथाबुक्याने मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी बालाजी निवृत्ती सोनटक्के, वय 31 वर्षे, व्यवसाय न्हावी रा. आसेगाव ता. वसमत जि. हिंगोली ह.मु. शुभम मंगल कार्यालयाच्या पाठीमागे साईनगर, नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 88/2022 कलम 326,324,323,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री शेख, मो. नं. 7875947154** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :–**दिनांक 13.03.2022 रोजी चे 13.30 वा. चे सुमारास, **लोकमान्य मंगल कार्यालय जवळ टावुन मार्केट दत्तनगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादी व सोबतचा लेबर हे केलेल्या कामाचे पैसे मागण्यासाठी त्यांचा गुत्तेदार यांचे कडे गेले असता पांढऱ्या रंगाचे पाणी फिल्टरचे कॅन वाटप करणारे अनोळखी ॲटोचालक व त्याचा साथीदार यांनी संगणमत करुन फिर्यादीस शिवीगाळ करुन बुक्याने व बांबुने मारुन नाकाचे हाड फॅक्चर केले व मुक्का मार देवुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी प्रकाश मलेश गायकवाड, वय 27 वर्षे, व्यवसाय मिस्त्री (गवंडी) रा. खोब्रागडे नगर, नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 101/2022 कलम 325,323,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोह/1629 हैबतकर, मो. नं. 9922951629** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :–

**इस्लापुर :–** दिनांक 16.05.2016 नंतर तीन महिने पासुन ते दिनांक 05.01.2021 पावेतो, **आरोपीतांचे घरी बोधडी ता. किनवट जि. नांदेड ह.मु. इस्लापुर ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस तुझ्या माहेरहुन व्यापार करण्यासाठी पन्नास हजार रुपये घेवुन ये म्हणुन चारित्र्यावर संशय घेवून थापड बुक्याने मारहाण करुन उपाशी पोटी ठेवुन तीचा शारिरीक व मानसीक छळ केला, शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 29 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इस्लापुर** गुरनं 31/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री रमेश सोनबा कांबळे, मो.क्रं. 7875784485** हे करीत आहेत.

## 4)अपघात :–

**बारड :–** दिनांक 13.03.2022 रोजी 17.00 वा. ते 20.00 वा. चे दरम्यान, **भोकर ते नांदेड जाणारे रोडवर मुदखेड फाटयाजवळ ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे संदिप यलप्पा पवार वय 35 वर्षे व्यवसाय मजुरी रा. देगलुर ह.मु. भोसी ता. भोकर जि. नांदेड** हा अति दारु पिऊन भोकर ते नांदेड कडे जाणारे रोडवरुन जात असताना कोणत्यातरी अज्ञात वाहनाने धडक मारल्याने तो अतिशय गंभीर जखमी होवुन त्यांचे हात पाय व डोक्यास मार लागुन अति रक्तस्त्राव झाल्याने जागीच मरण पावला. वगैरे **फिर्यादी साहेबराव खंडु मेटकर वय 40 वर्षे रा. भोसी ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बारड** गुरनं. 24/2022 कलम 279,304(अ) भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री सुभाष ग्यानोबा वानोळे, मो.क्र. 8208506753** हे करीत आहेत.

## 5)खंडणी :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 12.03.2022 रोजी चे 21.00 वा. चे सुमारास, **हॉटेल सावली, मुसलमानवाडी पाटीजवळ, नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करुन डीलक्स मोटार सायकलवर हॉटेलमध्ये येवुन फिर्यादीस ठोश्या बुक्यांनी तोंडावर,पाठीवर,छातीवर मारहाण करुन जिवे मारण्याचे उद्देशाने तलवार उगारुन 500/– रुपये हप्ता वसुल केला व साक्षीदार गजानन फुलारी यांचे कडुन फुलाची गाडी रोडवर चालवण्यासाठी 200/– रुपये हप्ता वसुल करुन घेवुन गेले. वगैरे **फिर्यादी हनुमंत दशरथराव डक वय 35 वर्षे व्यवसाय व्यापार रा. पिंपळगाव निमजी ता.जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 147/2022 कलम 386,323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री संकेत दिघे**, **मो.क्र. 9834255985** हे करीत आहेत.

## 6)प्रोव्हिबीशन :–

**1)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 13.03.2022 रोजी चे 12.50 वा. चे सुमारास, **लातुर फाटा ते ढवळे कॉर्नर कडे येणाऱ्या रोडलगत नाईक कॉलेज समोर, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारु किंमती 6400/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/492 संतोष रघुनाथ जाधव, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 148/2022 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2168 शेख जावेद**, **मो.क्र. 8999978576** हे करीत आहेत.

**2)इस्लापुर :–** दिनांक 13.03.2022 रोजी चे 16.10 वा. चे सुमारास, **मौजे तल्हारी तांडा येथे आरोपीच्या राहते घराचे बाजुस गोठयामध्ये ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या गावठी हात भट्टी दारु किंमती 2400/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोका/1383 नारायण शिवाजीराव पांचाळ, ने. पोस्टे इस्लापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इस्लापुर** गुरनं 30/2022 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2204 पाटील**, **मो.क्र. 9765999899** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड